# ॥ या बाळांनो ॥

भा. रा. तांबे

या बाळांनो, या रे या
लवकर भरभर सारे या
मजा करा रे मजा मजा,
आज दिवस तुमचा समजा .

स्वस्थ बसे तोचि फसे,
नवभूमी दाविन मी
या नगराला लागुनियां
सुंदर ती दुसरी दुनिया ॥१॥

खळखळ मंजुळ गाति झरे
गीत मधुर चहुंबाजुं भरे
जिकडे तिकडे फुलें फळें,
सुवास पसरे, रसही गळे .

पर ज्यांचे सोन्याचे,
ते रावे हेरावे
तर मग कामें टाकुनियां
नवी बघा या ही दुनिया ॥२॥

पंख पाचुचे मोरांना,
टिपति पाखरें मोत्यांना,
पंख फडकती घोड्यांना,
मौज दिसे ही थोड्यांना,

चपलगती हरिण किती
देखावे देखावे
तर मग लवकर धावुनिया
नवी बघा या ही दुनिया ॥३॥